**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.1 मनोहर बाळासाहेब पोखरकर यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.२ ते ४ व ६ तर्फे विधीज्ञ श्री.आर.डी.नवले यांचे मार्फत</u>–**

७. माझ्या आजोबांचे नाव किसन मनाजी पोखरकर असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांना काशिनाथ व बाळा असे दोन भाऊ होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा किसन आणि त्यांचे दोन भाऊ काशिनाथ व बाळा यांचे दरम्याने सन १९६३ साली वडिलोपार्जित मिळकतींचे वाटप झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटपामध्ये सर्व्हे नं.१८८/२अ ही मिळकत किसन यांचे वाटपाला आणि सर्व्हे नं.१८८/२ब ही मिळकत काशिनाथ यांचे वाटपाला गेली आहे.

८. किसन यांना बाळासाहेब व सोपान अशी दोन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बाळासाहेब हे लवकर मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बाळासाहेब व सोपान यांनी फेरफार नं.३९०६ ने वाटप करून घेतले आहे. साक्षीदार सांगतो की, ते वाटप चुकीचे झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाळासाहेब, सोपान अगर आम्ही ते वाटप चुकीचे असल्याबाबत आजतागायत कोठेही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार नं.३९०६ नुसार सोपान यांच्या वाटपाला आलेल्या मिळकतीपैकी त्यांनी सर्व्हे नं.१८८/२अ मधील २० आर क्षेत्र प्रतिवादी क्र.६ यांची आई सखुबाई मुरलीधर पोखरकर व ०३ आर क्षेत्र कलम शांताराम फापळ यांना विक्री केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाळासाहेब व सोपान यांचे दरम्यान फेरफार नं.३९०६ नुसार झालेले वाटप सन १९८४ साली झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार नं.३९०६ नुसार वाटप होताना सर्व्हे नं.१८८/२अ मधील २० आर क्षेत्र काशिनाथ मनाजी पोखरकर यांना दिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, काशिनाथ मनाजी पोखरकर यांना २० आर क्षेत्र दिल्यामुळे त्यांचे सन १९६३ च्या वाटपानुसार सर्व्हे नं.१८८/२ब चे क्षेत्र ५६ आर वरून ७६ आर झाले. साक्षीदार सांगतो की, ते चुकीचे झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, काशिनाथ यांना तात्याबा,

पंढरीनाथ व मुरलीधर अशी तीन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तात्याबा, पंढरीनाथ व मुरलीधर यांनी त्यांच्या मिळकतींचे वाटप करून घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं.१८८/२ब मधील प्रत्येकी २४ गुंठे जमीन तात्याबा, पंढरीनाथ व मुरलीधर यांनी आपले वाटपास घेतली असून ०४ गुंठे जमीन रस्त्यासाठी सोडली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८४ साली काशिनाथ पोखरकर यांना सर्व्हे नं.१८८/२अ मधील २० आर क्षेत्र दिले, ते चुकीचे झाले आहे, अशी माझी तक्रार आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावरून माझे व प्रतिवादी यांचे पूर्वीपासून वाद आहेत.

**९.** हे म्हणणे खरे आहे की, पंढरीनाथ, तात्याबा व मुरलीधर यांनी माझ्याविरुध्द सर्व्हे नं.१८८/८, १८८/९ व १८८/१० बाबत रे.दि.मु.नं.२२९/२०१५ चा दावा दाखल केला आहे. साक्षीदार सांगतो की, तो दावा चुकीचा आहे. त्या दाव्यामध्ये मी कैफियत दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या कैफियतीमध्ये पंढरीनाथ, तात्याबा व मुरलीधर यांचेकडे २० आर क्षेत्र चुकीचे गेले आहे व ते क्षेत्र आमचे आहे, अशी मी तक्रार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते २० आर क्षेत्र आम्हाला मिळावे, अशी माझी ईच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८४ साली काशिनाथ पोखरकर यांचे वाटपाला जे २० आर क्षेत्र दिले, ते क्षेत्र आमच्याच ताब्यात आहे, अशी माझी त्या कैफियतीमध्ये तक्रार आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या २० आर क्षेत्रावर माझे व प्रतिवादी यांचेमध्ये ब–याच वेळा वाद होवून पोलीस केसेस झाल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्याचे कामी सर्व्हे नं.१८८/८, १८८/९ व १८८/१० मधील त्या दाव्यातील वादींचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये, अशी माझ्याविरुध्द तूर्तातूर्त मनाई ताकीद झाली आहे. सर्व्हे नं.१८८/७ मधील ४० गुंठे क्षेत्रावर हक्क सांगण्याबाबत प्रतिवादींनी मला कधीही नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं.१८८/७ मधील

४० गुंठे क्षेत्र माझ्या ताब्यात आहे, अशी प्रतिवादींनी कधीही, कोठेही तक्रार केलेली नाही.

**१०.** मी नववी नापास आहे. मी या दाव्यामध्ये प्रतिवादींनी दिलेली कैफियत वाचली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये दावा मिळकतीवर हक्क सांगणारे कोणतेही कथन केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांची सर्व्हे नं.१८८/२ब सध्याचा सर्व्हे नं.१८८/८, १८८/९ व १८८/१० ही जमीन दावा मिळकतीच्या दक्षिणेला लागून आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी दावा मिळकतीला कधीही हरकत अडथळा केलेला नसताना निव्वळ त्यांचेविरुध्द मनाई हुकूम घेवून प्रतिवादी यांचे सर्व्हे नं.१८८/२ब मधील २० आर क्षेत्रामध्ये कब्जा करणेचा माझा हेतू आहे व त्यासाठी मी हा दावा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी दावा मिळकतीवर कधीही हक्क सांगितलेला नाही व त्या मिळकतीला कधीही हरकत अडथळा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी २० आर क्षेत्रावरील कब्जा सोडावा, अशी माझी ईच्छा असल्याने मी प्रतिवादी यांचेविरुध्द हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.01.08 18:18:40 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अकोले,**
ता.अकोले, जि.अहमदनगर.

**दिनांक – ०८.०१.२०२६**